International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.5 Apr-May 2022

# महात्मा फुले यांच्या भारतीय शेती आणि शेतकऱ्यांविषयी विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता

**प्रा.एस.यू.ढाले**
अथहर मिर्झा वि.जा.भ.ज.कनिष्ठ महाविद्यालय,काळी (दौ).ता.महागाव जि. यवतमाळ

**प्रस्तावना**

महात्मा फुले यांना भारतातील मानवमुक्तीचे पहिले प्रणेते म्हटले जाते. १९ व्या शतकात भारतात सामाजिक सुधारणाचे जे प्रयत्न झालेत त्यामध्ये महात्मा फुले यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. भारतातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विषमतेविरूद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद इ. आधूनिक मूल्ये येथील समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये पुरोहितशाही शिगेला पोहचली होती. ब्राम्हणांची मानसिक व बौद्धिक अधोगती झाली होती. स्वार्थ बोकाळला होता. धर्माच्या नावाखाली जातीयवाद वाढीस लागला होता. गरीब, अज्ञानी, कष्टाळू, शुद्र, शेतकरी आणि अस्पृश्यादी अतिशुद्राचे शोषण वाढले होते. ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ब्राम्हणांनी इंग्रजी शिक्षण घेऊन विविध सरकारी खात्यामधून सरकारी नोकऱ्या मिळवल्या. खेड्यामध्ये कुलकर्णीच्या स्वरूपात प्रशासक ब्राम्हणच होते. शिक्षक, वकील, पोलीस, भिक्षूक, आणि सावकार ब्राम्हणच असल्याने त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. मालकी हक्कामुळे सावकारी व्यवसायाला नवीन तारण मिळू लागले. सामाजिक, धार्मिक, शोषणात आर्थिक शोषणाचे नवे हत्यार आले. यामुळे शेतकरी, कामगार, अस्पृश्याचे सर्वांगीण शोषण होऊ लागले होते. या शोषणातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी व त्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महात्मा फुले यांनी "शेतकऱ्यांचा आसूड" हा ग्रंथ लिहला. या ग्रंथात त्यांनी सामाजिक जीवनात शेतकऱ्यांचे अज्ञानामुळे होणारे शोषण सर्वांसमोर आणले. याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी **महात्मा फुले यांच्या भारतीय शेती आणि शेतकऱ्यांविषयी विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता** हा विषय प्रस्तुत अध्ययनासाठी निश्चित केला आहे.

## उद्देश

**महात्मा** फुले यांच्या भारतीय शेती आणि शेतकऽयांविषयी विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकताष या प्रस्तुत अध्ययनासाठी निश्चित केलेल्या विषयाची पुढील आहेत.

## उद्देश

1. महात्मा फुले यांचे भारतीय शेती आणि शेतकऽयांविषयी विचाराचा अभ्यास करणे.
2. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दूरावस्थेमागील आर्थिक कारणांची केलेली मीमांसा जाणून घेणे.
3. महात्मा फुले **यांनी** सर्व शेतकऱ्यासाठी सुचवलेला शेती विकासाचा व्यापक कार्यक्रम जाणून घेणे.

## गृहितके

या प्रस्तुत अध्ययन विषयाची गन्नहितके पुढीलप्रमाणे आहेत.

१. महात्मा फुले यांचे भारतीय शेती आणि **शेतकऱ्यांविषयी** विचार मांडले आहेत.

२. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दूरावस्थेमागील आर्थिक कारणांची केलेली मीमांसा केली आहे..

३. महात्मा फुले यांनी सर्व शेतकऱ्यासाठी शेती विकासाचा व्यापक कार्यक्रम सुचविला आहे.

**महात्मा फुले यांचे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांविषयी विचार**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे अज्ञानामुळे होणारे शोषणातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी व त्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी १८८३ मध्ये "शेतकऱ्यांचा आसूड" हा ग्रंथ लिहला.[1] या ग्रंथाचे प्रकाशन त्यांच्या मृत्यूनंतर झाले. परंतु या

ग्रंथाच्या हस्तलिखीत प्रती गव्हर्नर जनरल आणि बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांना पाठवल्या होत्या. या ग्रंथात त्यांनी सामाजिक जीवनात शेतकऱ्यांचे अज्ञानामुळे होणारे शोषण सर्वांसमोर आणले. यामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या दूस्थितीचे केलेले निरीक्षण वाचताना सव्वाशे वर्षापुर्वीचे लिखाण आहे असे वाटत नाही. अगदी आजच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन आहे असे वाटते. त्यांनी मांडलेले शेतीचे अर्थशास्त्र व महाराष्ट्रात १९८० मध्ये अस्तित्वात आलेल्या शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र यामध्ये समान सुत्र आहे.[२] ते म्हणजे शेतकऱ्यांच्या दूरावस्थेमागील आर्थिक कारणांची मीमांसा होय. **महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दूरावस्थेची केलेली मीमांसारू**

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दूरावस्थेची मीमांसारू केलेली आहे. ते म्हणतात की,भारतातील शेतकऱ्यांची दूरावस्था होण्यामागे शेतकऱ्यांमध्ये असणारे अज्ञान आहे. या अज्ञानामुळे त्यांचे शोषण शेटजी व भटजी या दोन्ही घटकाकडून सातत्याने होत असल्याने शेतकरी पुर्णपणे नागवला गेला आहे. पुर्वी ज्या शेतकऱ्याजवळ फार थोडी शेती असायची त्यावर तो आपला उदरनिर्वाह करीत असे. याचबरोबर सभोवतालच्या परिसरातील जंगलामधून लाकुड, फळे, फुले, पाने जमा करून त्याची विक्री करून आपला उदरनिर्वाह करीत असत. तसेच शेळी, मेंढी, गाय पाळून गावातच वास्तव्य करीत असत. परंतु सामाजिक मालकीची असलेली जंगले सरकारी झाल्यामुळे गरीब शेतकऱ्याच्या उदरनिर्वाहाचा आधार नष्ट झाला आहे. इंग्लंडमधील कारागीर लोकांनी तयार केलेल्या नित्यउपयोगी वस्तू आयात केल्यामुळे देशी कारागीरांची दैना उडाली आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे विभाजन होऊन अल्पभुधारकाचे प्रमाण वाढले आहे.भारतातील सुपीक शेतीमधून पीकामागून पीके घेत असल्यामुळे जमीनीची उत्पादकता कमी होऊन ती नापीक बनली आहे. तसेच गोवधामुळे मजबूत बैलांची पैदास कमी झाली आहे. गायरानाच्या कमतरतेमुळे पोटभर चारा-वैरण मिळेनाशी होऊन जनावाराचा ऱ्हास होत चालला आहे. जिराईत शेते पीकामागून पीके घेऊन थकली आहेत. शेतजमीनीची धूप होउन लक्षावधी खंडी खताचे सत्व समुद्रात वाया दवडले जाते. पिकांचा डुकरे येऊन नाश करतात. अशा शेतीच्या समस्यांची नोंद महात्मा फुले यांनी केली आहे. या समस्येमुळे भारतातील शेतकरी हवालदिल झाला आहे. इंग्रजानी शेतकऱ्यांवर रोख महसुली कर लादल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारात विकुन शेतसारा शासनाकडे भरावा लागत होता. शेतमालाची बाजारात व्यापाऱ्यांकडून अत्यंत कमी दरात खरेदी केली जात असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन होऊनही अत्यंत कमी रक्कम मिळत असल्याने उत्पादन खर्चही भरून न निघाल्याने त्याला कर्जासाठी सावकाराकडे धाव घ्यावी लागते. या सावकारी कर्जाचा बोजा वाढत जाऊन त्याच्या दारिद्रयात दिवसेंदिवस वाढ होत गेली आहे. इंग्रज शासनाने शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या महसुली कराचा जनकल्याणाकरीता वापर न करता त्यामधून कामगारांचे पगार, ऐषाराम यासाठी वापरलो. या वरील सर्व कारणामुळे भारतीय शेती व शेतकरी यांची दूरावस्था झाली आहे.[३] अशा स्वरूपात महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे वर्णन केले आहे.

**शेती विकासाचा कार्यक्रम :**

1. महात्मा फुले यांनी सर्व शेतकऱ्याचे हित साधू शकणारा एक शेती विकासाचा व्यापक कार्यक्रम सांगितला आहे.
2. गाई व बैल यांची पैदास वाढविण्यासाठी कामाचे गाई/बैल याची हत्या बंद करावी.
3. उतारावरील शेतांना तालीवजा बंधारे, काळे-गोरे लष्कर व पोलीस खात्यामधील रिकाम्या शिपायाकडून बांधून द्यावेत.
4. डोंगर टेकड्यामधील दऱ्या खोऱ्यात तलाव, तलाव-तळी जितकी होतील तेवढी बांधून घ्यावेत.
5. धूप थांबविण्यासाठी ताली बांधाव्यात.
6. सरकारने विहीरी बांधण्यासाठी पाणथळ जागा शोधून काढाव्या. हेच काम बिनसरकारीरित्या होण्यासाठी बक्षिसे द्यावी.
7. नदीनाले व तळ्यातील गाळ शेतकऱ्यांना फुकट नेऊ द्यावा.
8. उत्तम प्रकारच्या शेळ्यामेंढ्याची निपज वाढवावी.
9. शेतकऱ्यांना शेतीविषयक प्रशिक्षण द्यावे. दरसाल प्रदर्शने भरवावी. शेती शिक्षण घेणाऱ्यांनी पदव्या द्याव्यात. शेतकऱ्यांना लोहारी-सूतारी काम शिकवावे.[४]

**शेतकऱ्यांच्या विकासासाठी उपाययोजना :**

महात्मा फुले यांनी भारतीय शेती व शेतकरी यांच्या समस्यांना व प्रश्नांना वाचा फोडून जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हणशाहीच्या कचाटच्यातून शेतकऱ्यांची सुटका करावयाची असेल तर त्यावर मुख्य उपाय म्हणजे शुद्रातिशुद्रांना साक्षर करणे आवश्यक आहे. शिक्षणाअभावी येथील शुद्रातीशुद्रांची व शेतकऱ्यांची दू:स्थिती झाली आहे. या दू:स्थितीचे वर्णन करतांना ते लिहतात-

**"विद्येविना मति गेली, मती विना नीती गेली;**
**नीतीविना गती गेली! गती विना वित्त गेले;**

**वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले"[६]**

शिक्षणाअभावी शेतकऱ्याची व शुद्रातीशुद्रांची सारासार विवकेशक्ती नष्ट झाली आहे. नीती भ्रष्ट झाली आहे. त्यामुळे दारिद्रय प्राप्त झाले. यामुळे शेतकऱ्यांनी धर्मभोळेपणा सोडून विद्या संपादन करावी. सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, गरीब विद्यार्थ्यांकरीता वस्तीगृहे सुरु करावीत. शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांच्याच जातीतील प्रत्यक्ष शेतीची कामे करून दाखवणारे शिक्षक नेमावेत. मराठी सहावी नांगर, पाभर व कोळवी हाकण्याची परीक्षा देऊन पास होणाऱ्यांना पाटीलकी द्यावी. यामुळे पाटीलकी मिळण्याच्या हेतूने शिक्षणाचा प्रसार होईल. प्रशिक्षित पाटील असल्याने भट-कुलकर्ण्यांना आपआपसात भांडणे लावता येणार नाहीत व जास्तीचा शेतसारा द्यावा लागणार नाही. गुजर, मारवाडी खोटे मापे बनवून शेतकऱ्यांना लुबाडतात म्हणून अशी मापे व भेसळ केलेला माल जप्त करून कार्यवाही करावी तसेच दारु पिणाऱ्या पाटलांवर लक्ष ठेवून कार्यवाही करावी.

**निष्कर्ष**

१. महात्मा फुले यांनी भारतीय शेती व शेतकरी यांच्या समस्यांना व प्रश्नांना वाचा फोडून जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

२. शिक्षणाअभावी शेतकऱ्याची व शुद्रातीशुद्रांची सारासार विवकेशक्ती नष्ट झाली आहे. नीती भ्रष्ट झाली आहे. त्यामुळे दारिद्रय प्राप्त झाले. यामुळे शेतकऱ्यांनी धर्मभोळेपणा सोडून विद्या संपादन करावी हा महत्वाचा संदेश दिला आहे.

३. महात्मा फुले यांनी सर्व शेतकऱ्याचे हित साधू शकणारा एक शेती विकासाचा व्यापक कार्यक्रम शेतकऱ्यासाठी दिला आहे.

**समारोप :**

भारत हा कृषीप्रधान देश असला तरी येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने पुर्वीपासून बहुसंख्येने असलेल्या कष्टकरी शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले. धर्मशास्त्राचा आधार घेऊन या समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवले आणि उच्च वर्णियांनी शिक्षण आणि प्रशासनव्यवस्थेत शंभर टक्के आरक्षण उपभोगले. उच्चवर्गात शिक्षणाच्या माध्यमातून प्रशासनातील मक्तेदारी कायम ठेवली. परंतु महात्मा फुले यांनी अत्यंत दृष्टेपणाने ही बाब हेरून शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची कारणे मांडली. यापैकी प्रमुख कारणे शिक्षण आणि सिंचन आहेत. हे सांगून त्यांनी शिक्षणावर विशेष भर दिला. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाकडून मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जात आहे. परंतू येथील शेती आजही निसर्गावर अवलंबून असल्याने बेभरवशाची आहे. तसेच शेतमालाला मिळणारा भावही अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारलेली नाही. दारिद्रय, उपासमार, रोगराई यामुळे या संकटात भर पडली आहे. शेतकऱ्यांना आपल्या मुलांना उच्च शिक्षण देणेही शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे शक्य नाही. शिक्षणामुळे मती, नीती, गती येते परंतु उच्च दर्जाचे व खिशाला परवडणारे शिक्षण उपलब्ध नसल्याने स्वातंत्र्य भारतातही कष्टकरी शेतकरी वर्गाची मती, नीती, गती गेली. नैराश्याने ग्रासून मन मेली व जीवन मिळालेच आहे तर केवळ यांत्रिकपणाने एकेक दिवस ढकलला जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात बरेच बदल झाले आहेत. देशाचा विकास होतो आहे परंतू याचा लाभ प्रस्थापितांनाच होऊन त्यांची श्रीमंती वाढत आहे. सर्वसामान्य कष्टकरी शेतकरी वर्गाला एस.टी.चा प्रवासही महागडा ठरतो आहे. या कृषीप्रधान देशात कृषी केंद्रीत धोरण आवश्यक आहे परंतु प्रशासनातील प्रस्थापित उच्च वर्गीयाने शेतकऱ्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. परंतु शेतकऱ्याची पुढील पिढी शिक्षणाच्या अस्त्राने जागृत होऊन आपले हक्क मिळवण्यासाठी सज्ज होत आहे. हे १९८० नंतरच्या काळात महाराष्ट्रात प्रामुख्याने दिसून आले आहे. यामध्येच महात्मा फुले यांच्या विचारांचे यश आहे.

**संदर्भसुची :**


1. कीर, धनंजय.,मालशे, डॉ. स.ग.,व इतर,(२००६),'महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, सातवी आवृत्ती, २६७
2. कीर, धनंजय.,मालशे, डॉ. स.ग.,व इतर,(२००६),'महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, सातवी आवृत्ती, २६८
3. कीर, धनंजय.,मालशे, डॉ. स.ग.,व इतर,(२००६),'महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, सातवी आवृत्ती, १४५
4. मुलाटे,डॉ. वासुदेव., (संपादक),(२००२ )गुलामगिरी',औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, ६
5. नरके, हरी., (संपादक),(२००१) 'महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा', मुंबई, महाराष्ट्र शासन,
6. कीर, धनंजय.,मालशे, डॉ. स.ग.,व इतर,(२००६),'महात्मा फुले समग्र वाङमय, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, सातवी आवृत्ती, २६७